प्रति,

दि. 29-6-2017.

मा. उपविभागीय अधिकारी सो.
उपविभागीय कार्यालय, नवीन भाग,
जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
जळगांव.

विषय :- मौजे सावखेडा बु।। ता.जि.जळगांव येथील गट नं. 972/3, मध्ये बांधकाम परवानगी मिळणे बाबत.

अर्जदार :- चंद्रा कंस्ट्रक्शन जळगांव चे भागीदार, श्री. मुकेश शांतीलाल लखपाणी. रा.जळगांव.

उपरोक्त विषयान्वये अर्ज करितो की, मौजे सावखेडा बु।। ता.जि.जळगांव येथील गट नं. 972/3, मध्ये चंद्रा कंस्ट्रक्शन ने रो-हाऊस चे बांधकाम, रो हाऊस नं. 23 ते 29 व 36 ते 45 पूर्ण केलेले असुन तसा बांधकाम पुर्णत्वाचा (कंम्पलीशन सर्टीफीकेट) ग्रामपंचायत सावखेडा बु।। यांचे कडुन घेऊन सदर घरांची विक्री आधीच केलेली आहे. शिल्लक राहिलेल्या जागेत वाढीव बांधकाम स्किम नुसार करावयाचे असुन त्याचे 3 नविन प्लॅन अर्जासोबत जोडलेले आहेत.

तरी आपल्या कार्यालयाकडुन गट नं. 972/3 मधील रो-हाऊस व वाढीव बांधकाम योजनेस परवानगी मिळणेसाठी अर्ज दाखल करीत असुन बांधकाम परवानगी देण्यात यावी ही नम्र विनंती

29/6/2017
लिपीक
उपविभागीय अधिकारी
जळगांव भाग यांचे कार्यालय

कंपनीसाठी
CHANDRA CONSTRUCTIONS
PARTNER

लिपीक
उपविभागीय अधिकारी
यांचे कार्यालय

टिप :- अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची यादी
एकुण 1 ते 8

Scanned by CamScanner

दि. १८/०१/२०१८.

प्रती,
महारेरा मदत केंद्र अधिकारी साहेब,
महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण
ए-विंग , झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण .
प्रो.अनंत काणेकर मार्ग
वांद्रे (पूर्व), मुंबई 400051.

विषय : - महारेरा नोंदणी कामी मार्गदर्शन मिळणे बाबत.
अर्जदार : - चंद्रा कंसट्रक्शन जळगावचे भागीदार रोहन मुकेश ललवाणी,
पत्ता:- प्लॉट नं ६३ ते ७१/४, चन्द्रम, लेक सीटी लेन नं ३, शिरसोली रोड, जळगाव ४२५००१ संपर्क :- ८८८८८२९२२२, ९३७०००७०७२ इमेल :- rohanworld3@gmail.com चा सविनय सादर

महोदय,

प्लॉट क्र. २ ते १० , १६ ते २३ व २६ ते ४९ या जागेचे एकत्रीकरण (अमलग्मेशन) करणे साठी मा.उपविभागीय अधिकारी साहेब , जळगाव यांचे कडे दिनाक.२७/१२/२००६ रोजी अर्ज दाखल केला व त्याचा मंजुरीचा परवानगी आदेश क्र.विभाजन /एसआर/८/२००७ उप विभागीय अधिकारी जळगाव भाग जळगाव यांचे कार्यालय मार्फत दिनाक.३०/०२/२००७ मिळाला. एकत्रीकरण करतेवेळी सदर प्लॉटस मधून ९ मीटर चा रस्ता जात असल्याने तो तसाच ठेऊन २ ते १०, १६ ते २३ व २६ ते ४९ / अ याचे क्षेत्र ४६८०.१९ चौ.मी व २ ते १०, १६ ते २३ व २६ ते ४९ / ब " याचे क्षेत्र २५६३.७५ चौ.मी. असे करण्यात आले आहे. त्या पैकी प्लॉट क्र २ ते १०, १६ ते २३ व २६ ते ४९ / अ या प्लॉट जागेला पूर्वेस ९ मीटर , पश्चिमेस १२ मीटर, उत्तरेस ९ मीटर व दक्षिणेस १८ मीटर रोड आहेत. ह्या जागेत १ ते २९ ब्लॉक्स मंजुरी व प्लॉट क्र २ ते १० ,१६ ते २३ व २६ ते ४९ / ब " या जागेत ३० ते ४५ ब्लॉक्स ची सावखेडा ग्रामपंचायत ची मंजुरी दि. १२ /०५ /२००९ घेऊन बांधकाम सुरु करण्यात आले आहे. त्यापैकी २३ ते २९ व ३० ते ४५ ह्या ब्लॉकस जागेचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले आहे व बांधकाम पूर्णत्वाचा दाखला मिळाला आहे. सदर ब्लॉकसची विक्री सुद्धा करण्यात आलेली आहे.

मात्र प्रस्तावित ब्लॉक क्र ८ ते १६ च्या ठिकाणी जमिनीत पाया खोल असल्याने तेथे स्थापत्य अभियंता (structural engineer) यांचे सल्ल्या नुसार ब्लॉकस बनविणे शक्य नसल्याने बहुमजली (Multi Storey) बनविण्याचे ठरविण्यात आले. त्यासाठी पुन्हा दोन इमारतीचे म्हणजेच विंग A व विंग B चे प्लान तयार करून तळमजला + ५ अशी सावखेडा ग्रामपंचायतची मंजुरी दि. २७/०६/२०१४ मिळाली आहे. परवानगीनुसार बांधकाम सुरु करून जवळपास ते पूर्ण करण्यात आलेले आहे.

दरम्यान शासनाने MAHARERA ACT लागू केला आहे. त्यासाठी नवीन नियमानुसार आम्ही म. सहायक जिल्हाधिकारी, जळगाव यांचे मार्फत नकाशे मंजुरी साठी **मा. सहायक संचालक,नगर रचना, जळगाव** यांचा कडे पाठवले आहे.

2) **शासन निर्णय क्र व्हीपीएम २०१५ / प्र. क्र. ३९ / प. रा ४ दि ११ / १२/ २०१५** नुसार शासन निर्णय दि १५-५-२०१५ पासून लागू झालेला आहे त्यानंतर बांधकाम परवानगी नगर रचना कार्यालयाकडून घेणे आवश्यक झाले आहे त्याअगोदर बांधकाम परवानगी हि ग्रामपंचायतच देत होती. आमची मूळ बांधकाम

Scanned by CamScanner

परवानगी दि. १२ /०५ /२००९ सावखेडा ग्रामपंचायतची असून सुधारित बांधकाम परवानगी (Revised Permission) दि २७/०६/२०१४ ची आहे त्यामुळे आमचे बांधकाम नकाशे ग्राम पंचायती कडून व ग्राम पंचायत सुधारणा अधिनियम २०१४ लागु होणेपूर्वीच मंजूर झालेले होते व त्यप्रमाणे जागेवर बांधकाम सुद्धा जवळपास पूर्ण झालेले. त्यामध्ये आमचा काहीही दोष नाही. दरम्यान शासनाने MAHARERA ACT हा दि. १ मे २०१७ रोजी लागू केला. MAHARERA मध्ये नाव नोंदणी (Registration) करणेसाठी नवीन नियमानुसार **आम्ही म. उपविभागीय अधिकारी साहेब जळगाव** यांचे कार्यालयात. दि.२१ /०६ /२०१७ रोजी संपूर्ण कागदपत्रासह ३ प्रतीत अर्ज दाखल केला.सदर कार्यालयाने अर्जाची एक प्रत नकाशे सह मंजुरी साठी **मा. सहायक संचालक,नगर रचना, जळगाव** यांचे कार्यालयात पाठविली. त्यासाठीची छाननी फी १४/०७/२०१७ ला भरली. संबधित कार्यालया कडून सहकार्य, मार्गदर्शन मिळण्यास फार मोठ्या प्रमाणात विलंब होत आहे तसेच सदर कार्यालयाने अद्याप पर्यंत संबधित अर्जावर कुठल्याही प्रकारची कारवाई तसेच निर्णय आम्हाला कळविला नाही. या विलंबामुळे आम्हाला MAHARERA ACT नुसार नोंदणी करता येत नाही. यामुळे आमचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे. तसेच मिळकत विक्री, सौदा असा कुठल्याही प्रकारचा व्यवहार करता येत नाही.

सदर प्रकरणी आपले लक्ष वेधण्यासाठी आम्ही आपणास दि. १२ नोव्हे २०१७ व १५ नोव्हे २०१७ रोजी ई - मेल पाठविला तरी आपल्या कार्यालयाने त्यास कुठल्याही प्रकारचे उत्तर दिले नाही सनदशीर मार्गाने न्याय मागणी साठी पत्र व्यवहार करून काहीही खुलासा होत नसल्याने आम्हाला आमच्या उदरनिर्वाहासाठी कायदे भंग करून मिळकती ची विक्री, सौदा करणे,ग्राहकां कडून व्यवहार पोटी उचल घेणे असे काम नाईलाजाने करणे भाग पडेल.

वास्तविक सदर प्लॉट जागेवर बांधकाम करते वेळी अधिकृत COMPINANT AUTHORITY (ग्रामपंचायत,सावखेडा) यांचेकडून उचित परवानगी घेऊन तसेच स्थापत्य अभियंता, वास्तू विशारद यांचे मार्गदर्शन व सल्ल्यानुसार बांधकाम करण्यात आलेले आहे म्हणुन शासनाने लागू केलेला MAHARERA ACT नुसार नोंदणी करणे कामी आम्हाला ग्रामपंचायतच्या परमिशन प्लानप्रमाणे RERA Registration देण्यात यावे व नैसर्गिक न्याय तत्वानुसार आमचे प्रकरणात लक्ष घालून मार्गदर्शन व सहकार्य करावे अशी नम्र विनंती .

आपल्याच सहकार्याच्या प्रतीक्षेत |

आपला

CHANDRA CONSTRUCTIONS
ROHAN MUKESH LALWANI
(PARTNER)

टिप :- सोबत १) दि १२/०५/२००९ चा बांधकाम परवानगीचा आदेश
२) दि ०५/०५/२०१३ व ११/०४/२०१४ चा बांधकाम पूर्णत्वाचा दाखला
३) दि २७/०६/१४ सुधारित बांधकाम परवानगी आदेश
४) शासन निर्णय क्र व्हीपीएम २०१५ / प्र. क्र. ३९ / प. रा ४ दि ११ / १२/ २०१५
५) म.उपविभागीय अधिकारी कार्यालयात परवानगी करिता दाखल अर्ज प्रत.
६)टाउन प्लानिंग छाननी फी भरणा पावती
७)महारेरा ऑफिस मुंबई पाठविलेले ई- मेल.

Scanned by CamScanner